# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे कार्यालय
## कॅम्प, अमरावती - 444 602

कार्यालयीन दूरध्वनी 2662090 / 2662593. 2662680 (वैयक्तिक), फॅक्स- 2663314
ई-मेल-पत्ता- ccftamravati@mahaforest.gov.in / aticcfa@gmail.com


आदेश कमांक : 187 — अमरावती, दिनांक: 03.09.2016

**विषय : वन–उपज वाहतूकीसाठी पास देण्यासाठी वनाधिका–यांना प्राधिकृत करण्याबाबत.**

महाराष्ट्र वन नियमावली, 2014 मधील नियम 32 (1) (अ) अन्वये प्राप्त शक्तींचा वापर करून वन–उपज वाहतूकीसाठी पास देण्याकरीता अमरावती (प्रादेशिक), वनवृत्तातंर्गत सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), यांना याद्वारे खालील मर्यादांच्या अधीन राहून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**(1)** उक्त नियमावलीतील नियम ३२ (१) (अ) अन्वये खालील प्रजातीचे इमारती लाकूड अथवा त्यापासून प्राप्त होणारे वन–उपज यांना पास देताना संबंधित परिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक यांचे स्वतःची मोहर आणि सहीनुसार पास जारी होतील.

(i) Acacia catechu (खैर वृक्ष)

(ii) Dalbergia latifolia (रोजवूड वृक्ष)

(iii) Mangrove species (कांदळवनांच्या प्रजाती)

(iv) नरक्या (अमृता वृक्ष)

(v) Santalum album (चंदन वृक्ष) आणि

(vi) Red sanders (रक्त चंदन)

**(2)** उक्त नियमावलीतील नियम ३२ (१) (ब) मधील तरतूदी अन्वये खालील प्रजातींचे इमारती लाकडाचे घनफळ ८ घनमीटरपेक्षा जास्त आणि लहान लाकडाचे घनफळ २० रचीत घनमीटरपेक्षा जास्त असेल त्यावेळेस सहाय्यक वनसंरक्षक यांचे पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका–याचे पूर्व मंजूरीशिवाय पास जारी करण्यात येणार नाहीः–

(i) Adina cardifolia (हळदू किंवा हेद)

(ii) Artocarpus integrifolia (फणस)

(iii) Hardwickia binata (अंजन)

(iv) Madhuca latifolia (मोह अथवा मोहा अथवा महुवा)

(v) Mangifera indica (आंबा किंवा आम)

(vi) Ougeinia dalbergioidies (तिवस)

(vii) Pterocarpus marsupium (बिजा किंवा बिजा साल)

(viii) Syzigium cumini (जांभूळ किंवा जामून)

(ix) Tamarandis indica (चिंच किंवा ईमली)

(x) Tectona grandis (साग किंवा सागवान)

(xi) Terminalia chebula (हिरडा किंवा हर्रा)

(xii) Terminalia paniculata (किंजळ किंवा किंदळ)

(xiii) Terminalia tomentosa (ऐन किंवा सादडा किंवा साजा)

**स्पष्टीकरण** :–''लहान लाकूड'' म्हणजे सर्वात मोठया भागातील २५ से.मी. पेक्षा कमी वेढी आणि २ मीटर लांबीपर्यंतचे सर्व लाकूड.

**(3)** उक्त नियमावलीतील नियम ३२ (१) (क) अन्वये एक काल्पनिक टनापेक्षा जास्त बांबूसाठी पास देण्याकरीता पूर्व परवानगी प्रदान करण्याकरीता संबंधित परिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**स्पष्टीकरण** :–''एक काल्पनिक टन'' म्हणजे बांबूच्या नगांची एकूण लांबी २००० धाव मीटर बरोबर असेल.

**(4)** पास जारी करणारे वन परिक्षेत्र अधिकारी यांनी भारतीय वन अधिनियम 1927 मधील कलम 66 अनुसार त्यांचेवर असलेल्या जबाबदा–यांकडे तसेच इतर प्रचलित कायदेशीर तरतूदीकडे दुर्लक्ष होवू नये, याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

सदरचे आदेश ५ सप्टेंबर, २०१६ पासून अंमलात येतील.

03/09/16

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती

**कमांक.मुवसंप्रा / कक्ष–2 / महसूल / वा.परवाना / 1419 / 2016.17**
**अमरावती दिनांकः ३ सप्टेंबर, २०१६**

**प्रति,**

**(1)** उप वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती / बुलडाणा / पूर्व मेळघाट चिखलदरा / पश्चिम मेळघाट परतवाडा.
**(2)** विभागीय वन अधिकाकरी (दक्षता), निर्देशन कार्यालय, अमरावती.
**(3)** सहाय्यक वनसंरक्षक (सर्व), अमरावती वनवृत्त, अमरावती.
**(4)** अमरावती वनवृत्तातील, सहाय्यक वनसंरक्षक, फिरते पथक, (प्रादेशिक),(सर्व)
**(5)** अमरावती प्रादेशिक वनवृत्तातंर्गत, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),(सर्व)

प्रतिलिपीः–सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रतिलिपीः–प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रतिलिपीः–अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सरंक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रतिलिपीः–अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रतिलिपीः–मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), (सर्व)
प्रतिलिपीः–मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) व क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प (सर्व)
प्रतिलीपीः–पोलीस आयुक्त, (सर्व)
प्रतिलीपीः–जिल्हाधिकारी, (सर्व)
प्रतिलीपीः– पोलीस अधीक्षक, (सर्व)
प्रतिलिपीः–उप वनसंरक्षक (प्रादेशिक) व (वन्यजिव), सर्व यांना माहितीस रवाना.
प्रतिलीपीः– विभागीय वन अधिकारी, स्वतंत्र विभाग सर्व
प्रतिलीपीः– मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे संकेतस्थळ
प्रतिलिपीः–'' आदेश फाईल''

03/09/16.

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती